


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७८७. वा | गुरुवार दि. ३० मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयात बेकायदेशीररित्या काढली जाताहेत बिले ?

## अंभोरे यांच्यावर कुणाचे आहे वरदहस्त...

## अंभोरे यांच्या कार्यकाळातील अफरातफरीची पुराव्यासह माहीती पुढील सत्रात...

**पोस्टमार्टम १४**

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालय हे भ्रष्टाचाराचे एक प्रचंड असे मोठे कुरण बनले आहे, हे आता वेगळे सांगण्याची गरजच राहिलेली नाही. कारण या रुग्णालयात चालणारे विविध प्रकारचे भ्रष्टाचार आता सूर्यप्रकाशाइतके स्पष्टपणे समोर आलेले आहेत. या भ्रष्टाचारांवर कारवाई करण्याऐवजी वरिष्ठ अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे आता स्पष्ट दिसून येत आहे. जिल्हा रुग्णालयात होणाऱ्या विविध प्रकारच्या भ्रष्टाचाराच्या गाथांमध्ये वीजतंत्री एस.एल.अंभोरे यांनीही आपल्या भ्रष्टाचाराची गाथा लिहिली आहे. अंभोरे नामक या मस्तवाल, मुजोर आणि बदमाश अधिकाऱ्याची भ्रष्टाचारासोबतच अनेक प्रकारची कृष्णकृत्येही दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज उघड करीत राहणार आहे. एस. एल. अंभोरे यांचे पद जिल्हा सामान्य रुग्णालयात वीजतंत्री हे आहे. अंभोरे यांना वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती देताच येत नाही, परंतु वरिष्ठांशी साटेलोटे करून अंभोरे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कामात प्रचंड असा हस्तक्षेप करतात. कधी-कधी तर ते वरिष्ठांशी हातमिळवणी करून थेट या पदाचा पदभार घेतात. अंभोरे यांना साथ देणारे जिल्हा रुग्णालयात बरेच जण आहेत. वैद्यकीय अधिकारी वाघ यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांकडे केलेल्या तक्रारीत अंभोरे यांच्या बनवाबनविचा पाढाच वाचला आहे. वाघ यांच्या म्हणण्यानुसार अंभोरे हे अवैध पद्धतीने बिले काढण्याचे काम करीत आहेत. त्यातून मोठा भ्रष्टाचार अंभोरे करीत आहेत. जेंव्हा एखादा वैद्यकीय अधिकारी अंभोरे यांचे म्हणणे ऐकत नाही, तेंव्हा अभोरे संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याला धमकावणे, त्याच्या कामात हस्तक्षेप करणे, खोट्या सह्या मारून बिले मंजूर करण्याचे प्रताप करतात. अंभोरे हे सर्व प्रताप अनेक महिन्यांपासून करीत आहेत. या माध्यमातून त्यांनी लाखो रुपयांची अवैध बिले आजवर काढलेली आहेत. वाघ यांनी अंभोरे यांची अनेक कृष्णकृत्ये जिल्हा शल्यचिकित्सकांसमोर उघड केली आहेत. वाघ यांचे म्हणणे आहे की, अंभोरे हे स्वतः सुटीवर असताना देखील जिल्हा रुग्णालयात येऊन बेकायदेशीररित्या बिले काढत आहेत. शिवाय त्यांनी वाघ यांच्या कार्यकाळात त्यांचे लॉकर देखील तोडले व बिलांमध्ये घोळ केला. या संपूर्ण प्रकरणात धक्कादायक बाब म्हणजे जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून जिल्हा रुग्णालयात कोणीही येवो, परंतु अंभोरे यांची दादागिरी आणि अंभोरे यांचा भ्रष्टाचार हा अविरतपणे सुरूच राहतो. जिल्हा शल्यचिकित्सक पदावर डॉ. तडस असतांना अंभोरे यांच्या कार्यपद्धतीत काहीही फरक पडला नाही. डॉ. तडस असो किंवा अजून कोणीही एकतर अंभोरे यांच्या कृष्णकृत्यांकडे दुर्लक्ष करीत आहेत किंवा ते अंभोरे यांच्या बनवाबनवी मध्ये सहभागी आहेत, असे अत्यंत खेदाने म्हणावे लागते. कारण कोणीही अधिकारी येवो अंभोरे यांच्या भ्रष्टाचाराचा खेळ दिवसरात्र सुरूच असतो. अंभोरे यांच्यासंदर्भात जिल्हा रुग्णालयात अनेक प्रकारच्या चर्चा असतात. काही महिन्यांपूर्वी जिल्हा रुग्णालयातील एका वैद्यकीय अधिकाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झाला होता. यानंतर तरी जिल्हा रुग्णालयाचे कामकाज सुधारणे गरजेचे होते. तसेच अंभोरे यांच्यासारख्या मस्तवाल, मुजोर आणि षड्यंत्री अधिकाऱ्यावर कारवाई होणे गरजेचे होते. परंतु तसे न होता अशा कुटील कारस्थानी अधिकाऱ्यांना संरक्षण मिळत असल्या कारणाने ते आणखीनच मस्तवाल होत चाललेले आहेत.




आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या या भ्रष्टाचाराची तात्काळ दखल घेऊन यासंदर्भात ठोस उपाययोजना करावी. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडे अंभोरे यांच्या भ्रष्टाचाराचे सज्जड पुरावे असून, जोपर्यंत अशा कटकारस्थानी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होत नाही, तो पर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज याविरोधात सातत्याने आवाज उठवत राहणारच आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# बेदम मारहाणीत तरुणाचा मृत्यू चौघांवर खुनाचा गुन्हा दाखल

**जनसंचलन/ मेहकर**

शहरातील माळीपेठ मधील २२ वर्षीय तरुणास ३ ते ४ जणांनी २७ मे च्या उशीरा रात्री बेदम मारहाण केल्याने त्या तरूणाचा मृत्यू झाला असून याप्रकरणी मेहकर पोलिसांनी चार आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. शहरातील माळीपेठ मधील राजू ननवरे हे मरण पावलेल्या तरूणाचे वडील असून त्यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले की २७ मेला दुपारी अंदाजे ४ वाजता गणेश किशोर थाबडे हा घरी आला व आकाश कुठे म्हणून आवाज देऊ लागला असता राजू ननवरे, त्यांची पत्नी व मुलगा सागर बाहेर आले असता आकाश कुठे त्याचा मी आज खून करणार आहे असे बोलून निघून गेला. रात्री साडेअकरा वाजता शेजारच्या सागर बामणे याने आकाशचा भाऊ पवन याला सांगितले की आकाशचा फोन आला होता. त्याला जानेफळ रोडवरील सैलानी तलावाच्या मागे मारहाण झाली आहे. पवन, सागर बामणे, रवी ननवरे, करण ननवरे हे ऑटोने घटनास्थळी गेले असता त्यांना आकाशला मारहाण झालेली दिसले. त्यांनी आकाशला मेहकर ग्रामीण रूग्णालयात आणले मात्र ईथे काहीच सुविधा नसल्याने कर्तव्य करीत असलेल्या डॉ. नी बुलढाणा रेफर करायला सांगितले. मात्र पवन व मित्रांनी आकाशला अकोला करीता हलविले. रस्त्यात आकाशला कोणी मारले विचारले असता त्याने गणेश थाबडे व अन्य ३ जणांनी मारले असे सांगितले. अकोला सामान्य रुग्णालयात आकाशला डॉ. नी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी आकाशचे वडील राजू ननवरे यांनी मंगळवारी मेहकर पो. स्टे. ला तक्रार दिली असून पोलिसांनी आरोपी गणेश थाबडे व अन्य ३ विरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. प्रभारी उपविभागीय अधिकारी मनीषा कदम, पोलीस निरीक्षक राजेश शिंगटे यांनी सकाळीच घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

# लांडग्याच्या हल्ल्यात आठ बकऱ्या ठार

**जनसचंलन/चिखली**

तालुक्यातील पळसखेड जयंती शेतशिवारातील दिलीप राजाभाऊ खरात यांच्या गोठ्यावर लांडग्याने रात्रीच्या सुमारास हल्ला चढवीत बांधलेल्या आठ बकऱ्यांना ठार केल्याची घटना २९ मे च्या सकाळी उघडकीस आली. यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. तालुक्यातील पळसखेड जयंती शिवारातील गट नं. ११७ मधील दिलीप राजाभाऊ खरात यांनी त्यांच्याकडील आठ बकऱ्या नेहमीप्रमाणे आपल्या गोठ्यात बांधल्या होत्या. २८ मेच्या रात्री लांडग्याने गोठ्यावर हल्ला चढवून त्यात बांधलेल्या आठही बकऱ्यांना ठार केले आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाचे अधिकारी खान आणि तलाठी भुसारी यांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा करून वरिष्ठांकडे अहवाल सादर केला आहे. तर पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मंगेश गाडे यांनी मृत बकऱ्यांचे शवविच्छेदन केले. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्याने शासनाकडून मदत मिळण्याची मागणी केली आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गायींचा कळप समोर आल्याने कारचा अपघात

जनसंचलन/मेहकर




समृद्धी महामार्ग वाहतुकीसाठी खुला झाल्यापासून अपघात वाढले आहे. दोन दिवसांपूर्वी मेहकरचे व्यापारी राजन महाजन हे मुलगा व मुलीसह वर्ध्याहून मेहकरकडे कारने येत असताना नांदगाव खंडेश्वरच्या एक्झीटजवळ अपघात घडला. त्यामध्ये तीन गायींचा जागीच मृत्यू झाला, तर महाजन कुटुंब बचावले. अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. प्राप्त माहितीनुसार, मेहकरचे व्यापारी राजन महाजन हे कटुंबासह कारने वर्धा येथून येत होते. समृद्धी महामार्गाने येत असताना नांदगाव खंडेश्वर एक्झीटवर कारच्या समोर अचानक चार गायी आल्या. चालकाने कारवर नियंत्रण मिळेपर्यंत तीन गायींचा मृत्यू झाला. या अपघातात महाजन कुटुंबिय बचावले असून, कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. समृद्धी महामार्गावर गुरे येऊ नये. यासाठी जाळी लावण्यात आलेली आहे. मात्र काही कामासाठी ही जाळी बाजुला करण्यात आल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

# लोणार तालुक्याचा दहावी परीक्षेचा ९६ टक्के निकाल मुलीच ठरल्या अव्वलस्थानी

जनसंचलन/लोणार

सोमवारी दि. २७ मे रोजी दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला. तालुक्याचा निकाल ९६.०३ टक्के लागला आहे. श्री शिवाजी हायस्कूलचा ९८ टक्के निकाल लागला असून, महाराणा प्रताप हायस्कूलचा ८७.६१ टक्के निकाल लागला आहे. निकालात मुलांपेक्षा मुलीच वरचड ठरल्याचे दिसून आले. तालुक्यातील ३७ शाळांमधून २ हजार ४०२ विद्यार्थ्यांपैकी २ हजार ३७३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यापैकी २ हजार २८५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये विशेष प्रावीण्य श्रेणीमध्ये ११५२, प्रथम श्रेणीमध्ये ७४८, द्वितीय विद्यार्थी ३५८ उत्तीर्ण झाले आहेत. तालुक्यातील ३७ पैकी १५ शाळांचा निकाल १०० टक्के लागला. यामध्ये जनता विद्यालय, अंजनी खुर्द, सवप् हायस्कूल रायगाव, वसंतराव नाईक विद्यालय, खलेगाव, छत्रपती शाहू महाराज विद्यालय, भूमराळा, नॅशनल उर्दू हायस्कूल, सुलतानपूर, स्व. जे. डी. भुतड़ा कलानिकेतन महाविद्यालय,कारेगाव,



विवेकानंद विद्या मंदिर, लोणार, सहकार विद्या मंदिर बीबी, सहकार विद्या मंदिर सुलतानपूर, मापारी गुरुकुल इंटरनॅशनल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज या शाळांचा १०० टक्के निकाल लागला आहे.

# वाद सोडविण्यासाठी गेलेल्याला बेदम बदडले!

## खामगाव शहरातील घटना अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल

जनसंचलन/ खामगाव

वाद विकोपाला गेल्यानंतर भांडण सोडविण्यास गेलेल्या एका ४२ वर्षीय बीएसएफमधील सेवानिवृत्ताला अनोळखी व्यक्तींनी पाठलाग करून मारहाण केल्याची घटना रविवारी उशिरा रात्री स्थानिक बाळापूर रोड परिसरात घडली. फिर्यादीनुसार, विजय सहदेव बधे (४२) याने रु. गजानन सोसायटी शेगाव २६ मे रोजी रात्री खामगाव येथील बसस्थानक परिसरात त्यांच्या चुलतभावासोबत आले. त्यावेळी त्यांचा चुलतभाऊ आणि एका अनोळखी व्यक्तीच्या वादाचे पर्यावसन हाणामारीत झाले. त्यावेळी तक्रारदाराच्या चुलतभावाने अनोळखी व्यक्तिला चाकू मारला. हा वाद सोडविण्यास गेल्यानंतर तीन ते चार अनोळखी व्यक्तिनी त्यांना



बेदम मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले. जीव वाचविण्यासाठी घटनास्थळ सोडले असता एकाने दगड मारला. तर काहींनी पायावर मारहाण केली. त्यापैकी कोणत्याच आरोपीला ओळखत नाही. मात्र, ते चाकू मारलेल्या मृतकाचे नातेवाईक असल्याचा आरोप बढे यांनी तक्रारीत केला. या तक्रारीवरून खामगाव शहर पोलिसांनी सोमवारी उशिरा रात्री तीन ते चार अनोळखी इसमांविरोधात गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोहेकॉं. मनोहर गोरे करीत आहेत.

# बिबट्याच्या हल्ल्यात ६ मेंढ्या ठार, ५ जखमी

## ढोरपगाव शिवारातील नागरिकांमध्ये भिती

जनसंचलन/ खामगाव



तालुक्यातील ढोरपगाव शिवारातील एका गोठ्यात घुसून बिबट्याने ६ मेंढ्यांचा फडशा पाडल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. यावेळी बिबट्याच्या हल्ल्यात इतर ५ मेंढ्यासुध्दा जखमी झाल्या आहेत. ढोरपगाव येथील शेतकरी विठ्ठल किसन कवडे यांचा गावालगत गोठा असून त्या ठिकाणी ते मेंढ्या बांधून ठेवतात. नेहमी प्रमाणे कवडे यांनी काल २७ मे च्या रात्री गोठ्यात मेंढ्या बांधून ठेवल्या व गोठा बंद करून ते घरी गेले. दरम्यान रात्री बिबट्याने कवडे यांच्या गोठ्यात घुसून मेंढ्यांवर हल्ला चढविला. यात ६ मेंढ्या मरण पावल्या असून ५ मेंढ्या गंभीर जखमी झाल्या आहेत. दरम्यान मंगळवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गेल्या काही दिवसापासून ढोरपगाव शिवारात. बिबट्याची दहशत निर्माण झालेली आहे. यामुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी वनविभागाने बिबट्याची दहशत रोखण्यासाठी काहीतरी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# मोबाईल चोरून पळून जाणाऱ्या चोरट्यास पोलिसांनी पाठलाग करून पकडले...

जनसंचलन/ चिखली

दि. २७ मे रोजी चिखली येथील आठवडी बाजार असल्याने साकेगाव येथील सुरेश विजयसिंग परिहार हे सायंकाळी ५:३० वाजता चिखली शहरातील पारधी बाबा रोड वरील भाजीपाल्याच्या दुकानात भाजीपाला घेण्यासाठी खाली वाकले असता त्यांच्या पँटच्या मागील खिशात ठेवलेला रिअल मी एक्स कंपनीचा मोबाईल एक इसम गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या खिशातून काढून घेऊन डी पी रोडकडे पळत जात असताना सुरेश परीहार हे त्याच्या मागे पळत गेले, डी पी रोडवर ड्युटीवर तैनात असलेल्या पोलिसांना सदर चोरटा इसम पळत असतांना लक्ष्मी मार्केट मध्ये पोलिसांनी त्या चोरट्यास पटलाग करून पकडले. त्यांनतर सुरेश परीहार यांनी पोलिसांना सांगितले की सदर ह्या इसमाने माझा मोबाईल चोरला आहे, त्यावर त्या इसमाची पोलिसांनी झडती घेतली असता त्या इसमा जवळ सुरेश परीहार यांच्या व्यतिरिक्त आणखी ५ मोबाईल मिळून आले. सदर त्या इसमाची कसून विचारपूस केली असता त्याने अब्बास याकूब पटेल, ( वय ४२ वर्ष रा. कावी, ता. जंबसुर, जि. भरुच, गुजरात ) असे सांगितले. सुरेश परीहार यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी चोरट्या ईसमा विरूद्ध अप क्र ४०४/२४ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर या गुन्ह्याच्या संबंधाने पोलीस निरीक्षक संग्राम पाटील यांनी पोलीस स्टेशनचे डी बी पथक प्रमुख यांना गुन्हा संदर्भाने सखोल तपास करून अजून आरोपी आहेत का बाबत सूचना दिल्या वरून डीबी पथकाचे इंचार्ज पोऊनी नितीनसिंह चव्हाण, पोना अमोल गवई, पोकॉं रोहिदास पंढरे, पंढरीनाथ मिसाळ, सागर कोल्हे, राहुल पायघन, निलेश सावळे यांनी आरोपी अब्बास याकूब पटेल याची सखील विचारपूस केली असता त्याने सांगीतले की, देऊळघाट ता. जि. बुलढाणा येथील शेख मोइन यानेच मला चिखलीच्या बाजारामध्ये मोबाईल चोरी करण्यासाठी आणले होते. या त्याच्या सांगण्यावरून शेख मोईन याचा शोध घेण्यासाठी बुलढाणा ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील देउळघाट येथे जाऊन सदर आरोपीस मोठ्या शिताफीने ताब्यात घेऊन सदर गुन्ह्याबद्दल विचारपूस केली असता त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिल्याने आरोपी १) अब्बास याकूब पटेल ( वय. ४२ वर्ष, रा. कावि ता. जंबसुर, जि. भरूच गुजरात ), २) शेख मोईन शेख मुकीम ( रा. सय्यद मोहल्ला, देउळघाट, ता. जि. बुलढाणा ) या दोन आरोपींच्या ताब्यातून वेगवेगळ्या कंपनीचे ६ मोबाईल एकूण किंमत ६४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून या दोन्हीही आरोपींना अटक केली. सदरची कारवाई हि पोलीस अधीक्षक बुलढाणा, अप्पर पोलीस अधीक्षक बुलढाणा, उपविभागीय पोलिस अधिकारी बुलढाणा यांचे मारगदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संग्राम पाटील, डीबी पथकाचे ईंचार्ज पोऊनी नितीनसिंह चव्हाण, पोना अमोल गवई, पोकॉं राजेश मापारी, पंढरीनाथ मिसाळ, रोहिदास पंढरे, सागर कोल्हे, राहुल पायघन, निलेश साबळे, मपो कॉं रुपाली उगले, मपोहेकॉं माया सोनोने यांनी केली.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# बुलडाणा येथे १० जूनला डाक अदालत

जनसंचलन/बुलढाणा

बुलडाणा येथील डाक घर अधीक्षक कार्यालयात सोमवार, दि. १० जून रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे. देशातील पोस्टाची सेवा ही सामाजिक व आर्थिक जीवनाचा एक अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये अपरोक्षपणे पोस्टाच्या सेवेने एक वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण करून प्रभावित केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना, संभाष, पत्रव्यवहार किंवा सेवेमधील काही त्रुटीमुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार होते. या तक्रारींचा योग्यप्रकारे निवडा करण्यासाठी डाक अदालत घेण्यात येते. त्यात पोस्ट विभागाचे अधिकारी तक्रार सोडवितात. पोस्टाच्या कार्याविषयी किंवा कामकाजाबद्दल सहा आठवड्यांच्या आत तक्रारींचे निवारण झालेले नसल्यास किंवा समाधानकारक उत्तर मिळाले नसल्यास अशा तक्रारींची डाक अदालतीमध्ये दखल घेण्यात येते. विशेषत: टपाल, स्पीड पोस्ट, डाक वस्तू पार्सल, बचत बँक व मनीऑर्डर बाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जातात. यासाठी तक्रारींचा उल्लेख सर्व तपशिलासह केलेला असावा. यात तारीख, ज्या अधिकाऱ्यास मूळ तक्रार पाठविली असल्यास त्याचे नाव व हुद्दा याची माहिती देण्यात यावी. डाक सेवेबाबत तक्रार असल्यास गणेश आंभोरे, अधीक्षक डाक घर, बुलडाणा विभाग, बुलडाणा ४४३००१ यांच्या नावे दोन प्रतीसह दि. ७ जून २०२४ पर्यंत पोहोचतील असे पाठवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वाळूसाठे शोधण्यासाठी ड्रोन सर्वेक्षण करणार-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## नांदुरा तालुक्यात १७७५ ब्रास वाळू जप्त...

जनसंचलन/बुलडाणा



अवैध वाळूबाबत जिल्हा प्रशासनातर्फे आठवडाभरापासून कार्यवाही करण्यात येत आहे. पावसाळ्याच्या अगोदर मोठ्या प्रमाणात वाळूसाठा करण्यात येत आहे. या वाळूसाठ्याचा शोध ड्रोन सर्व्हेक्षणाने घेण्यात येणार आहे. या सर्व्हेक्षणात आढळणारा वाळूसाठा जप्त करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. वाळूसाठा निदर्शनास येऊनही कारवाई केली नसल्यास संबंधित तलाठ्यावर कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. मलकापूर, नांदुरा, मेहकर आणि संग्रामपूर तालुक्यात वाळूसाठे आणि वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाई करण्यात आली. नांदुरा तालुक्यात विविध ठिकाणी पथकाद्वारे १७७५ ब्रास वाळू साठे जप्त केले. मलकापूर उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांच्या मार्गदर्शनात अपर तहसिलदार आणि कर्मचारी यांच्या पथकाने ही कारवाई केली. यात बेलाड गट नं. २२४ येथे ३५४ ब्रास, बेलाड गट नं. ५ येथे ३२४ ब्रास, बेलाड गट नं. १९ येथे १०३ ब्रास, येरळी गट नं. २३६ येथे ८५ ब्रास, बेलाड गट नं. १०३ येथे ११० ब्रास, पलसोडा गट नं. ३५२ येथे ३१४ ब्रास, पतोंडा गट नं. १ येथे ३६२ ब्रास, नांदुरा खुर्द येथे १२३ ब्रास असा एकूण १७७५ ब्रास वाळूचा साठा जप्त करण्यात आला. मलकापूर येथे काल दिवसभरात एकूण ४०० ब्रास रेती साठा जप्त करून लिलावाची कार्यवाही करण्यात आली. उकळी, ता. मेहकर येथे ५० ब्रास रेती जप्त करण्यात आली. पूर्णा नदीकाठील सावळी, ता. संग्रामपूर गावनजीक वनविभागाच्या जमिनीवर चार विविध ठिकाणी सुमारे ४८० ब्रास वाळू साठा आढळून आला. मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल यांच्या सहाय्याने सदर वाळूसाठा जप्त करण्यात आला. सिंदखेड राजा तालुक्यातील उमरद येथे ४ ब्रास अवैध रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परवर मध्यरात्री कारवाई करण्यात आली. मंडळ अधिकारी एस. एस. म्हस्के, तलाठी जी. एस. टेकाळे, एस. जी. पांडव, आर. एस. देशमुख, व्ही. यू. कटारे, एस. आर. नागरे, आर. आर. लांडगे यांनी दि. २८ मे २०२४ रोजी रात्री कारवाई केली. उमरद येथे समाधान नारायण मोरे, रा. ताडशिवणी यांच्या मालकीचे चार ब्रास रेती भरलेले टिप्पर क्रमांक एमएच २८ बीबी ७४२६ हा अवैध रेती वाहतूक करताना आढळून आल्याने पोलिस ठाण्यात अटकाव करण्यात आला आहे. खामगाव येथे जप्त करण्यात आलेल्या वाहनाला उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या पथकाने कारवाई करून ६४ हजार रुपये दंड ठोठावला आहे.

# आरटीई प्रवेश प्रक्रिया सुधारित सूचनांनुसार राबविणार




जनसंचलन/बुलढाणा

उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सन २०२४-२५ या वर्षातील आरटीई प्रवेश प्रक्रियेच्या सुधारीत सूचना शिक्षण संचालक, प्राथमिक, पुणे कार्यालयाकडून निर्गमित झाल्यानंतर राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अंतर्गत दुर्बल, वंचित शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासवर्ग बालकांचे इयत्ता पहिली व पूर्व प्राथमिक वर्गस्तरावर कमीत कमी २५ टक्के प्रवेश राखीव ठेवण्यात तरतूद आहे. त्यानुसार २०२४-२५ या वर्षाची प्रवेश प्रक्रिया दि. ९ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे सुधारीत निकषानुसार सद्यस्थितीत राबविण्यात येत आहे. मात्र शासनाच्या २०२४-२५ या वर्षातील निर्गमित सुधारीत अधिसूचनेविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका, रिट याचिका दाखल झाल्या आहेत. उच्च न्यायालयाने शासनाच्या दि. ९ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या सुधारीत अधिसूचनेस स्थगिती दिली आहे. सन २०२४-२५ या वर्षाची आरटीई प्रवेश प्रक्रिया यापूर्वीच्या नियमानुसार राबविण्यासाठी आवश्यक ते बदल आरटीई पोर्टलवर करण्याबाबत निर्देश दिले आहेत. स्वयं अर्थसहायीत शाळा, पोलिस कल्याणकारी शाळा विना अनुदानित आणि महानगर पालिका शाळा स्वयं अर्थसहायीत शाळा यांचा समावेश करुन आरटीई प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी नव्याने अधिसूचना निर्गमित करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. त्यामुळे शिक्षण संचालक यांच्याकडून प्रवेश प्रक्रियेबाबत पालकांना यथावकाश कळविण्यात येणार आहे. याची नोंद जिल्ह्यातील तालुकास्तर कार्यालये, आरटीई शाळांचे मुख्याध्यापक आणि पालकांनी घ्यावी, असे आवाहन प्राथमिक शिक्षण विभागाने केले आहे.

# लग्न होत नसल्याने नैराश्यातून युवकाने केली आत्महत्या

## बावणबीर येथील खळबळजनक घटना...

जनसंचलन/सोनाळा



बुलढाणा जिल्हयात सातपुड्याच्या पायथ्याशी बावनबीर हे गाव आहे. येथील एका ३१ वर्षीय शेतमजूर युवकाने लग्न होत नसल्याने घरातच गळफास लावून जीवनयात्रा संपविल्याची खळबळजनक घटना मंगळवार २८ मे रोजी दुपारी ३ वाजेच्या दरम्यान उघडकीस आली या आत्महत्येमूळे समाजातील आजचे धगधगते वास्तव समोर आल्याने समाजमन सुन्न झाले आहे. उपवर मुलांचे लग्न होत नसल्याने त्यांचे वय निघून जात असल्याने युवक मानसिक तणावाने वैफल्यग्रस्त होऊन आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलत आहेत. याच कारणाने आत्महत्या केलेल्या शेतमजूर युवकाचे नाव संतोष शहादेव घाटोळे रा बावनबीर ता. संग्रामपूर असे आहे. तो आई वडीलाचा एककुलता एक मुलगा होता. या दुदैवी घटनेमुळे बावनबीर गावात एकच शोककळा पसरली आहे. या घटनेची फिर्याद सोनाळा पोलिस स्टेशनला मृतक युवकाचे वडील शहादेव पूर्णाजी घाटोळे यांनी दिली. यावरून पोस्टेला मर्ग क्र १२/२४ नुसार कलम १७४ जा. फौ. नुसार आकस्मिक गुन्हयाची नोंद घेण्यात आली आहे. फिर्यादीत नमूद असे की, लग्न होत नसल्याने वय निघून जात असल्याने व सतत लग्नाचा विचार येत असल्याने संतोष ने घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली. संपूर्ण कुटुंब शेतमजूरी करून उदरनिर्वाह चालवत आहे. गरिब परिस्थिती मुळे संतोषचा विवाह जूळत नव्हता. मृतक यास ३ विवाहित बहिणी आहेत. तर मृतक संतोष बांधकाम मजूरहोता. वडील परंपरागत माठ विक्रीचा व्यवसाय करतात. पुढील तपास पोहेकाँ विशाल गवई हे करित आहेत.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# असोला जहागीर ग्रामपंचायतीचा सावळा गोंधळ...

जनसंचलन/देऊळगावराजा

जहांगीर येथील ग्रामपंचायतच्या सचिव उर्मिला दिगंबर सवडे यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करून कारवाई करावी याकरिता एडवोकेट राजेश मांटे यांनी दिनांक १८ मे रोजी संबंधित विभागाकडे लेखी तक्रारी द्वारे केली आहे. असोला जहागीर येथे कार्यरत असलेल्या ग्रामसेविका सचीव उर्मिला सवडे या २०१८ पासून ग्रामपंचायत येथे कार्यरत आहे त्यांनी १४ व १५ व्या वित्त आयोग अंतर्गत अनेक विकास कामे बोगस व निकृष्ट दर्जाचे आहेच. शासन तसेच निविदा ऑनलाईन पद्धतीने न करता अंदाज पत्रकानुसार मंजूर केलेली ग्रामसेविका सवडे यांच्या चौकशीची मागणी आहे मोठ्या रकमेच्या निविदा प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने न करता नियमबाह्य पद्धतीने केलेली आहे व त्यामध्ये निकृष्ट दर्जाचे काम करून भ्रष्टाचार केलेला आहे. शासकीय निधीचा गैरवापर केलेला आहे व अनेक कामांची निविदा न काढता जवळच्या नातेवाईक व्यक्तींना दिलेली आहे व या गैरकारभाराची चौकशी करावी, अशी मागणी अॅड. राजेश मांडे यांनी लेखी तक्रारीद्वारे केली आहे. यामध्ये ग्राम पंचायत अंतर्गत अनेक बोगस कामे करत बीले काढलेली आहेत. नैसर्गिक आपत्तीचे अनुदान वाटप करताना नावे टाकून शासनाची फसवणूक केलेली आहे १४ वित्त आयोगातून गावातील पथदिवे नालीसफाई नळदुरुस्ती शाळा दुरुस्ती शोष खड्डे व इतर अकस्मिक खर्चाच्या नावाखाली विकास कामे दाखवून प्रत्यक्षात कोणतीही काम न करता शासनाची दिशाभुल केल्याची तक्रार अॅड. राजेश मांन्टे यानी ग्रामविकास मंत्रालय मुंबई विभागीय आयुक्त अमरावती, जिल्हाधिकारी बुलढाणा, जिल्हा परिषद बुलढाणा गट विकास अधिकार देऊळगावराजा लाच लुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा व इतर येथे केली आहे.

# गुरुकृपा माध्यमिक विद्यालय सावरखेड बु उज्वल यशाची परंपरा कायम



जनसंचलन/सावरखेड बु

गुरुकृपा माध्यमिक विद्यालय सावरखेड बु ता. चिखली या विद्यालयाची वर्ग दहावी शालांत परीक्षेच्या निकालामध्ये कायम नेत्रदीपक यश संपादन केलेले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये एकूण ४६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली पैकी ४५ विद्यार्थी पास झाले शाळेचा एकूण निकाल ९७.८२% असा उत्तुंग लागलेला आहे. सदर पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत, प्रथम श्रेणीमध्ये २२ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीमध्ये ०४ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांनी गुरुकृपा विद्यालयाच्या उत्तुंग निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेल्या दहावीच्या निकालात गुरुकृपा माध्यमिक विद्यालयातून सुरज विजय गायकवाड (९०.६०%) या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला व तेजस महादेव पांडे (९०%) या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक पटकावला तर तृतीय स्थानी निखिल सदानंद दहातोंडे (८८.२०%) या विद्यार्थ्याने बाजी मारली. या सर्व गुणवंत यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय शिवाजीराव सुखदेव काळे सर, संस्थेचे युवा नेतृत्व रवीभाऊ काळे, मुख्याध्यापक रविंद्र सोळंकी सर, तथा शिक्षक श्री सरदारसिंग गोलाईत, श्री गजानन सोळंकी, श्री माधवराव बनकर, श्री रमेश इंगळे, शिक्षकेतर कर्मचारी श्री गजानन सोळंकी, श्री राजेंद्र तळेकर, श्री श्रीकांत दहातोंडे, श्री दिलीप चिंचोले यांनी सुद्धा यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# गायरान जमिन व घराजवळ रेतीचे साठे करणे भोवले दिग्रस नारायणखेडसह दे. मही येथील २५ जणांवर गुन्हे दाखल

जनसंचलन/ अंढेरा

अनेकवेळा देऊळगाव राजा तालुक्यातील रेतीघाटावर तहसीलदाराचे पथक मंडळ अधिकारी यांचे पथक हे जेव्हा राऊंड मारायचे तेव्हा रेतीसाठा आढळून आला की त्या ठिकाणचे रखवालदार व रेती चोरणारे माफिया हे त्या ठिकाणाहून पळून जायचे साठ्याबाबत विचारपूस केली असता उडवाउडवीची उत्तरे द्यायचे. असे अनेक प्रसंग सर्व पथकांना आल्यानंतर तत्कालीन सिंदखेडराजा प्रभारी एसडीओ प्रवीण धानोरकर यांनी २२व २३ मे च्या दिवस रात्र रेती घाटावर टाकरखेड वायाळ दिग्रस या ठिकाणी आपल्या पोलीस प्रशासन परिवहन अधिकारी नायब तहसीलदार तलाठी यांच्या संयुक्त पथकाने रेती साठे पकडले व जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्या समक्ष त्या रेती साठ्याचे जागेवर लिलाव करून संबंधितांना अंदाजे २ हजार ते २२०० ब्रास या तीनही गावाच्या गायरान जमिनी वरील व रेती चोरांच्या घराजवळील शेतातील अशा ठिकाणच्या रेतीसाठ्याचा लिलाव करून रक्कम शासन जमा केली. या सर्व बाबीवरून खडकपूर्णाच्या नदीपात्रातून अवैधरीत्या रेती काढून साठा करणे व रेती चोरी करणे याबाबत यातील आरोपी हेच रेती चोरी करीत असल्याचे तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना यांची नावे निष्पन्न झाले वरून २६ मेच्या रात्री अंढेरा पोस्टेला येऊन तलाठी नारायण खेड निलेश जाधव यांच्या फिर्यादीवरून आरोपी दशरथ चेके, सुनील चेके, बाळू मुंढे, शिवा मुंढे, गणेश मुंढे, राजू वाघ, विजय चेके, उमेश चेके, बळीराम डोईफोडे, गोविंद देडे, विजय डोईफोडे आणि बळीराम शिंगणे, कार्तिक देडे सुभाष बकाल अभिजीत शिंगणे सर्व रा. नारायण खेड व अंढेरा देऊळगाव मही यांच्यावर अप ०१३९/२०२४ ३७९, ३४ भादंविसह कलम ४८,७ व ४८, ८ राष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून तसेच दिग्रस येथीलतलाठी सतीश तायडे यांच्या फिर्यादीवरून आरोपी क्रमांक एक मनोज उर्फ मनीष वाघ, रवि लाड, विकास वाघ, मदन मिसाळ, आकाश मान्टे, संजय पहाड, उमेश पहाड, ज्ञानेश्वर वाघ, दत्ता मान्टे, गणेश वाघ सर्व रा. दिग्रस यांच्यावर अप. नंबर १३८/२०२४ कलम ३७९,३४ भादंविसह कलम ४८, ७४८, ८, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अंतर्गत अंढेरा पोस्टेमध्ये या २५ जनावर रेतीचे अवैधरित्या उत्खनन करणे व साठा करणे व जमा करून ठेवणे गुन्हा दाखल झाला असून अंढेरा ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार रामेश्वर आंधळे व पोलीस कॉन्स्टेबल भागवत गिरी हे तपास करत आहे.

# वाहनांवर ७ लाख ७५ हजार रूपयांची दंडात्मक कारवाई




जनसंचलन/बुलढाणा

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय कार्यालयाकडून विना वाहन नोंदणी क्रमांक, वाहन नोंदणी क्रमांक नियमानुसार नसणे, तसेच फॅन्सी वाहन क्रमांक असणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायदा आणि नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे. गेल्या वर्षी ४७५ वाहनांवर ७ लाख ७५ हजार रूपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या आर्थिक वर्षात चालू वर्षी एप्रिल ते २४ मे २०२४ पर्यंत कारवाई करण्यात आली आहे. गेल्या वर्षी एप्रिल २०२३ मध्ये २२ वाहनांवर ४४ हजार रूपये दंड आकारण्यात आला. मे २०२३ मध्ये ४८ वाहनांवर ९४ हजार रूपये, जून २०२३ मध्ये ४४ वाहनांवर ७९ हजार रूपये, जुलै २०२३ मध्ये ४१ वाहनांवर ४४ हजार रूपये, ऑगस्ट २०२३ मध्ये ३७ वाहनांवर ६५ हजार ५०० रूपये, सप्टेंबर २०२३ मध्ये १७ वाहनांवर १८ हजार रूपये, ऑक्टोबर २०२३ मध्ये २३ वाहनांवर २४ हजार रूपये, नोव्हेंबर २०२३ मध्ये ३२ वाहनांवर ५८ हजार रूपये, डिसेंबर २०२३ मध्ये ५७ वाहनांवर ७२ हजार रूपये, जानेवारी २०२४ मध्ये ६८ वाहनांवर १ लाख ३१ हजार ५०० रूपये, फेब्रुवारी २०२४ मध्ये ५४ वाहनांवर ८७ हजार रूपये, मार्च २०२४ मध्ये ३२ वाहनांवर ५८ हजार रूपये दंड आकारण्यात आला. चालू वर्षात एप्रिल २०२४ मध्ये ४४ वाहनांवर ८१ हजार रूपये, मे महिन्यात आतापर्यंत १८३ वाहनांवर ३ लाख ४७ हजार ५०० असा २२७ वाहनांवर ४ लाख २८ हजार ५०० रूपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

# शेतशिवारातून ४४ हून अधिक स्प्रिंकलर तोट्यांची चोरी

जनसंचलन/ चिखली

घुबे, मिसाळवाडी, भरोसा, कोनड आदी भागात चोरट्यांचा सुळसुळाट वाढला असून आता तर शेतातील साहित्य देखील सुरक्षित राहिले नसल्याचा प्रत्यय २८ मे रोजी मिसाळवाडी शेतशिवारात आला आहे. या भागातील शेतात पिकांना पाणी देण्यासाठी लावलेल्या स्प्रिंकलर तोट्या चोरून नेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अंढेरा पोलिस स्टेशन अंतर्गत असलेल्या तालुक्यातील मिसाळवाडी येथील चार शेतकऱ्यांच्या शेतातील स्प्रिंकलरच्या तोट्या एका रात्रीतून लंपास झाल्याची बाब समोर आली आहे. सद्य:स्थितीत उन्हाळी पिके, फळबागा, वाचविण्यासाठी भाजीपाला पिके शेतकऱ्यांकडून सिंचनासाठी स्प्रिंकलरचा वापर चालविला आहे. या स्प्रिंकलरला असलेल्या सुमारे ४४ हून अधिक तोट्या चोरट्यांनी लंपास केल्या आहेत. यामध्ये मिसाळवाडी येथील शेतकरी राजू मिसाळ यांच्या शेतातील स्प्रिंकलरच्या १२ तोट्या, नारायण गुरुजी यांच्या १३, भरत भगत यांच्या १० तर सतीश भगत यांच्या ९ स्प्रिंकलर तोट्यांची चोरी झाल्याची माहिती आहे. याबाबत शेतकऱ्यांनी अंढेरा पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. दरम्यान, शेतशिवारातील या चोरीमुळे शेतकऱ्यांमध्ये भीती पसरली असून यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसानीसह शेती सिंचनाची प्रश्न निर्माण झाला असल्याने नुकसानग्रस्त शेतकरी हवालदिल झाले आहेत.याकडे पोलिसांनी तातडीने लक्ष देऊन चोरट्यांच्या बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.